आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
६ डिसेंबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून आदरांजली

- इंदू मिलच्या जागेवर बाबासाहेबांच्या स्मारकाचं काम पुढल्या वर्षी सहा डिसेंबरच्या आत पूर्ण करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- नाशिकमध्ये तपोवनात झाडं तोडून प्रदर्शन केंद्र बांधण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडून स्थगित

आणि

- अंध विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार गंगा कदमचा हिंगोलीतल्या मूळ गावी सत्कार

**<><><><><>**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज राज्यासह देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे. संसद भवनात आज लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्यासह संसद सदस्यांनी बाबासाहेबांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.*

*बाबासाहेबांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व न्याय, समता आणि संविधानाच्या तत्वांवरची त्यांची निष्ठा भारताच्या वाटचालीत महत्त्वाची ठरली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.*

*राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आदित्य ठाकरे, काँग्रेस*

*प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यासह इतर मान्यवरांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं.*

*इंदू मिलच्या जागेवर सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचं काम पुढल्या वर्षी सहा डिसेंबरच्या आत पूर्ण करण्याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. आंबेडकर यांनी उभारलेला संघर्ष हा मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा होता, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. देशभरातून आंबेडकरी अनुयायी मुंबईत चैत्यभूमीवर दाखल होत असून पहाटेपासूनच अभिवादनासाठी मोठी रांग लागली आहे.*

*चैत्यभूमी आणि परिसरात मुंबई महापालिकेनं विविध सुविधा पुरवल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात समता सैनिक दलाचे जवान आणि पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं मुंबईतील निवासस्थान असलेल्या राजगृह परिसरातही अनुयायी मोठ्या प्रमाणात भेट देत असून त्यांच्यासाठीही पुरेशा व्यवस्था केल्या आहेत. देशाच्या विविध भागातून येणाऱ्या अनुयायांसाठी चैत्यभूमी परिसरात १ लाख चौरस फूटाचा भव्य तंबू उभारण्यात आला असून त्यात चैत्यभूमीचं थेट प्रक्षेपण करणाऱ्या १० एलईडी स्क्रीनही लावण्यात आल्या आहेत. फिरती स्वच्छतागृहे, स्नानगृहे, रुग्णवाहिका आदी व्यवस्थाही करण्यात आली असून विविध ठिकाणी आरोग्य तपासणी केंद्रही स्थापन करण्यात आली असून ५८५ वैद्यकीय कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. मध्य रेल्वेनंही नागपूर, अमरावती, कलबुर्गी आणि कोल्हापूर येथून विशेष अनारक्षित रेल्वेगाड्या सोडल्या असून कल्याण ते परळ उपनगरी रेल्वेच्या १२ अतिरीक्त फेऱ्याही चालवल्या जाणार आहेत.*

***नागपुरात** विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक संघटनांनी विविध कार्यक्रमांद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. दीक्षाभूमी येथे बुद्ध आंबेडकरी साहित्य विक्रीच्या स्टॉलवर उपासकांची गर्दी होती. समता सैनिक दलाच्या वतीने रक्तदान शिबिरही घेण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी असलेल्या **लातूर** जिल्ह्यातल्या पानगाव इथं अभिवादनासाठी नजिकच्या राज्यातूनही अनुयायी आले होते. धाराशिवमध्ये विविध संघटनांनी रक्तदान शिबिर घेतलं. अकोल्यात मध्यरात्री मेणबत्ती मोर्चा झाला. रत्नागिरीत **सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने सलग दुसऱ्या वर्षी वही-पेन***

***शैक्षणिक साहित्य अभियान राबवलं.*** *नाशिक, नांदेड, भंडारा, सिंधुदुर्ग, सांगली, अमरावती यासह इतरही ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं.*

**<><><><><>**

अहिल्यानगर शहरात 4 हजार 381 दुबार मतदारांची नोंद असून त्यासंदर्भात निवडणूक अधिकारी तसंच जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. या संदर्भात साडे नऊ हजाराहून अधिक हरकती आल्या असून हे मतदार वगळण्याची मागणी अहिल्यानगर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष अभिषेक कळमकर यांनी केली आहे. अहिल्यानगर महापालिका मतदारसंघात जवळच्या श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातल्या मतदारांची नावं नोंदवली गेल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच, प्रारूप मतदार यादीत गोंधळ असल्याचा आरोप करत आपण न्यायालयात जाणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या शहादा पालिकेच्या स्ट्रॉंग रुमचे सील उघडून त्याऐवजी नवं सील लावल्याचा आरोप एका उमेदवारानं केला. मतदानआधी टाऊन हॉलमधल्या स्ट्रॉंग रुमचं सील उघडून मतदान यंत्रांचं वाटप केलं. त्यानंतर मतदान यंत्र ठेवल्यावर पुन्हा त्यावरच सील केल्याचा दावा प्रशासनानं केला आहे.

**<><><><><>**

कुंभमेळ्यासाठी नाशिक शहरातल्या तपोवनातल्या ५४ एकर वरची अठराशे झाडं तोडून त्या जागेवर प्रदर्शन केंद्र बांधण्याचा प्रस्ताव स्थगित करण्यात आल्याची माहिती कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. पर्यावरण प्रेमींचा वाढता विरोध लक्षात घेता प्रदर्शन केंद्राचा प्रस्ताव स्थगित करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

नाशिक शहरातलं पर्यावरण वाचवण्यासाठी गेल्या पंधरा दिवसांपासून तपोवनात विविध प्रकारची आंदोलन होत आहेत. अनेक पर्यावरणप्रेमींबरोबर राजकीय पक्ष देखील आंदोलनात सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

उड्डाणं रद्द झाल्यामुळे प्रवाशांच्या तिकीटाचे पैसे तात्काळ परत करावे. सर्व प्रलंबित प्रक्रीया उद्या संध्याकाळी आठ वाजेपर्यंत पूर्ण करावी, असे निर्देश नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने इंडिगोला दिले आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(विमानाची वेळ बदलण्यासाठी प्रवाशांकडून कुठलेही शुल्क आकारु नका. त्याचप्रमाणे प्रवाशांचं साहित्य नियोजित पत्त्यावर पुढल्या ४८ तासांत पोहोचवा असे निर्देशही सरकारनं इंडिगोला दिले आहेत. त्यावर ग्राहकांच्या तिकीटाचे पैसे परत करण्याचं काम प्राधान्याने केलं जात असल्याचं इंडिगोने म्हटलं आहे. आज रद्द होणाऱ्या उड्डाणांची संख्या कालपेक्षा खूप कमी झाली आहे, येणाऱ्या काही दिवसांत यात आणखी सुधारणा होईल, असं कंपनीनं म्हटलं आहे.*

*दरम्यान विमानभाडी नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारनं आज त्यावर कमाल मर्यादा लादली. त्यानुसार ५०० किलोमीटर साठी साडे ७ हजार, १ हजार किलोमीटरपर्यंत १२ हजार, १५०० किलोमीटरपर्यंत १५ हजार आणि त्यापुढे १८ हजार रुपयांपेक्षा जास्त विमान भाडं कुठल्याही विमान कंपनीला आकारता येणार नाही. प्रवाशांच्या मदतीसाठी एअर इंडिया फेऱ्या वाढवण्याचा विचारात आहे. एअर इंडियाने इकॉनॉमी क्लासचे तिकीट दरही कमी केले आहेत.*

*दरम्यान, खोळंबलेल्या प्रवाशांची सोय व्हावी म्हणून रेल्वेने अतिरीक्त डबे जोडून अधिक संख्येनं प्रवासी वाहतूक केली आहे.)*

**<><><><><>**

राज्यभरात येत्या 13 डिसेंबरला होणाऱ्या लोकअदालतीमध्ये ई-चलन प्रकरणांची तडजोड स्विकारली जाणार नसल्याचं मुंबई वाहतूक अपर पोलीस महासंचालक कार्यालयानं सांगितलं आहे. याबाबत नागरिकांनी अफवांना बळी पडू नये असं आवाहन करण्यात आलं आहे. आगामी लोकअदालतीत ई-चलन दंडात सवलत मिळणार असल्याची चुकीची माहिती काही युट्यूब, इंस्टाग्राम तसंच इतर समाज माध्यमांवर पसरवली जात असल्याचं निदर्शनास आलं असून नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असल्याने पोलीस विभागानं नागरिकांना सतर्कतेचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

सातारा इथं होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ लेखिका डॉक्टर मृदुला गर्ग या करणार असून समारोप सोहळ्याला ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक रघुवीर चौधरी उपस्थित राहणार आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी आज पुण्यात वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. साहित्यिक विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली १ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान हे अधिवेशन होणार आहे.

<><><><><>

नुकत्याच झालेल्या अंध महिला विश्वचषकावर नाव कोरणाऱ्या भारतीय संघाची उपकर्णधार गंगा कदम हिचा आज हिंगोलीतल्या फुटाणा या तिच्या मूळ गावी सत्कार करण्यात आला. त्यापूर्वी तिची गाडीतून मिरवणूक काढण्यात आली. तिला शासकीय सेवेत घेण्याचं आश्वासन पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिलं.

<><><><><>

विशाखापट्टणममध्ये सुरू असलेल्या एकदिवसीय मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं भारतासमोर २७१ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून भारतीय संघानं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

दक्षिण आफ्रिकेचा पूर्ण संघ ४७ षटकं आणि ५ चेंडूंमध्ये २७० धावा काढून तंबूत परतला. क्विंटन डिकॉक यानं १०६ धावांची उत्तम खेळी केली, तर कर्णधार टेम्बा बवुमा यानं ४८ धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ४ खेळाडू बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १८ षटकांत बिनबाद ९० धावा झाल्या होत्या.

आजचा सामना जिंकून मालिका २-१ नं जिंकण्याचा दोन्ही संघांचा प्रयत्न आहे.

<><><><><>

सांगली जिल्ह्यात संयम हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला जात आहे. किशोरवयीन विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवून त्यांच्यात व्यसनापासून दूर राहण्याची मानसिकता निर्माण करणं, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

गेल्या २४ तासांत नागपुरात सर्वात कमी ९ पूर्णांक ६ दशांश तापमानाची नोंद झाली.

//<><><><><>//